# इ. ११ वी केंद्रीय प्रवेश प्रक्रीया २०१५-१६

## अल्पसंख्यांक कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशाबाबत.

शासन पत्र क्रं. प्रवेश २०१४/प्र.क्र.११२/एसडी-२ दिनांक १४/५/२०१५ अन्वये कळविल्यानुसार अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेश प्रकिया त्यांच्या स्तरावर ऑनलाईन पध्दतीने करणे याबाबत संस्थांनी त्यांची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवावी व प्रवेश द्यावा जेणेकरुन विद्यार्थ्यांची सोय होईल असे आदेश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने ही दिनांक १४/५/२०१५ अन्वये अल्पसंख्यांक कोटयातील ५० टक्के प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवावी व शासनाच्या प्रचलित नियमानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. याबाबत कोणतीही तक्रार येणार नाही याचीही दक्षता घ्यावी असे सर्व अल्पसंख्यांक /उच्च माध्यमिक विद्यालये /कनिष्ठ महाविद्यालयास कळविण्यात आलेले आहे.

ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरुळीतपणे पूर्ण करण्यास खालील महत्वाचे मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहेत.

१. उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयाने आपली स्वत:ची वेबसाईट तयार करुन प्रसिध्द करावी.

२. या वेबसाईटमध्ये आपल्या महाविद्यालयातील शैक्षणिक व भौतिक सोयी सुविधा, शिक्षकवृंद, शिकवले जाणारे विषय याची माहिती सविस्तर पणे दयावी.

३. कनिष्ठ महाविद्यालयाने त्यांच्या भाषिक/ धार्मिक अल्पसंख्यांक नुसार इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्ज तयार करुन विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा आपल्या वेबसाईटवर डेटा एन्ट्री साठी उपलब्ध करुन देणे. प्रत्येक विद्यार्थी या वेब-साईटचा उपयोग स्वतंत्रपणे करेल अशी व्यवस्था करणे.

४. प्राप्त ऑनलाईन प्रवेश अर्जाची माहिती (डेटा) संकलीत करुन शाखानिहाय उपलब्ध जागांनुसार गुणवत्ता यादी (मेरीट लीस्ट) तयार करुन एक प्रत महाविद्यालयाच्या दर्शनी भागात लावावी व ऑनलाईन प्रसिध्द करणे.

५. विद्यार्थी आपले नांव यादीत तपासून आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश अर्ज व शैक्षणिक गुणवत्ता प्रमाणपत्रे सादर करुन प्रवेश निश्चित करेल.

६. अंतिम प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांची यादी कनिष्ठ महाविद्यालय आपल्या वेबसाईटवर व इ. ११ वी केंद्रिय प्रवेश समितीकडे तथा शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे.

७. तसेच इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाची वेबसाईट pune.fyjc.org.in वर उपलब्ध असलेल्या **Enter Filled In Seats** या लींकवर झालेल्या प्रवेशाची आकडेवारीची नोंद करावी.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १